मार्च 2020

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# AJANTA

March - 2020

Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. दिनेश किसनराव राऊत

... of the Paper Entitled

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा महिलोन्नती विचार

Referred Journal

Ajanta Prakashan, Jaisingpura ... Aurangabad (M.S.)
Mob. No. 9579260877 ... (0240) 2400877
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA






Volume-IX, Issue-I
January - March - 2020
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३७ | माणिक बंडूजी ब्रम्हभट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : एक जीवन प्रवास<br>**प्रा. डॉ. अनंत सूर्यभान सूर्यकार** | १४४-१४८ |
| ३८ | राष्ट्रसंतांचा सांगितिक दृष्टीकोन<br>**प्रा. उमेश उ. कुडमेथे** | १४९-१५० |
| ३९ | वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा महिलोन्नती विचार<br>**प्रा. डॉ. दिनेश किसनराव राऊत** | १५१-१५६ |
| ४० | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. आशा ग. धारस्कर** | १५७-१६२ |
| ४१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन शिक्षणविषयक विचार<br>**प्रा. डॉ. गोकुल शामराव डामरे** | १६३-१६७ |
| ४२ | राष्ट्रसंताची भजनावली - सामाजिक ऐक्याचा सांस्कृतिक वारसा<br>**डॉ. अनिता भागूत शालतिलक** | १६८-१७१ |
| ४३ | स्वयंपूर्ण ग्रामजीवनाचे तंत्र आणि मंत्र शिकविणारे क्रांतीपुरूष : तुकडोजी महाराज<br>**प्रा. महेंद्र द. झलके** | १७२-१७६ |

VOLUME - IX, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३९. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा महिलोन्नती विचार

**प्रा. डॉ. दिनेश किसनराव राऊत**
सहाय्यक प्राध्यापक, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

वं. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेची रचना केली. सदर ग्रंथामध्ये त्यांनी विविध विचारांचे लेखन केले. यामध्ये महत्वाचा विचार ठरला तो दृष्टिपरिवर्तन पंचकाचा. याध्येच त्यांनी महिलोन्नतीवर एक संपूर्ण अध्याय लिहिलेला आहे. याच समवेत त्यांचे जनजीवनसंलग्न विचार ज्या ठिकाणी आले आहेत त्या सर्वच बाबींचा विचार आपण प्रामुख्याने करणार आहोत. राष्ट्रसंतांनी जे लिखान केले आहे ते शंभर टक्के जननिष्ठ जाणियांमधून आले. त्यामुळे राष्ट्रसंत हे खऱ्या अर्थाने जनसाहित्यीक ठरतात. जनसाहित्याची समस्त विचारसूत्राचे त्यांच्या लेखनातून विविध रुपरंगात दिसून येतात.

**१. मातृगौरव**

समस्त जनांनी मातेस देवाचे स्थान दिलेले आहे. राष्ट्रसंत सुध्दा त्यास अपवाद नाहीत. ते सुध्दा मातेचे महत्व मान्य करताना म्हणतात-

**जिच्या हाती पाळण्याची दोरी ।। तीच जगाते उध्दारी ।।।।**

**ऐसी वर्णिली मातेची थोरी ।। श्रेष्ठ गुरुहून ही।।।। (अ.२०, ओ. ३)**

कारण तीच गर्भावस्थेपासुन बालकास सुसंस्कार देऊन त्याचा विकास घडवून आणू शकते. परंतु आज मातेस अत्यंत हीन पध्दतीने वागवले जात आहे. या गोष्टीची जाण राष्ट्रसंतांना आहे. म्हणूनच ते सांगतात.-

**विद्या गुरुहूनि थोर ।। आदर्श मातेचे उपकार ।।।।**

**गर्भापासोनि तिचे संस्कारा पालकांवरी।।।। (अ.२०, ओ. २)**

म्हणूनच गर्भवती स्त्रीला आनंदी ठेवण्याचा आग्रह राष्ट्रसंत धरतात. योग्य भोजन, आनंद, निद्रा, समाधान लाभावे म्हणून सर्वच बाबींकडे लक्ष ठेवण्याची आग्रही सूचना ते करतात. या गोष्टीमुळे राष्ट्राचे धन असणारी उत्तम संतती निपजण्यास मदत होईल असे त्यांचे मत होते. मातेचा गौरव करण्याच्या बाबतीत त्यांनी एकही सोडली नाही. यात त्यांच्या मनामध्ये मातेकरीता स्त्रियांबंधी किती गौरवाची भावना वसत होती. राष्ट्रसंत आपल्या लिखाणात येथेच थांबत नाहीत तर पूढे जाऊन त्यां संबंधीचे मत स्पष्ट करतात.

**२. ग्रंथातील स्त्री-निषेध**

प्रचीन काळी भातरतामध्ये स्त्री सत्ताक व त्यानंतर मातृसत्ताक पध्दती होती. पण पुरुषसत्ता स्थापित करण्यासाठी त्यांनी प्रथम कृषी क्षेत्र हाती घेतले व शरीर बळाच्या माध्यमातून प्रगती साधली व तिचे क्षेत्र घरापुरते संकुचित केले. धर्मग्रंथाच्या आधारे तिचेवर नानाविध दूषणे लादीली. भवविवशतेच्या तिच्या स्वभावधर्मामुळे तिला कमी लेखनाची एकही

संधी त्यांनी दडवली नाही. नरकाचे व्दार, नकोशी, पायातील वहाण आदि शब्दांची तिची सतत उपेक्षाच केली. पण असे असूनही समाजातले तिचे मानाचे स्थान कोणीही नाकरु शकला नाही. म्हणून व्रतवैकल्ये, पूजा, तप, जपजाप, आचारशुध्दी, संयम, उपासतापास या सर्वांना तिला सामोरे जायलासांगून तिची घोर अपेक्षाच या समाजाने सुरु केली.

मात्र अडीअडचणीचे काळात स्त्री ही पतीलाच नव्हे तर संपूर्ण घरादाराला सांभाळून घेते हे हा समाजपूरुष विसरला. ती मात्र तिचे कर्तव्य विसरली नाही. म्हणूनच ती आपले कार्य मनोभावे करीत राहीली आहे. राष्ट्रसंत लिहीतात-

**जेव्हा पुरुष होय चिंतातुर ।। तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार ।।।।**

**हे मी पाहिले घरी अपार ।। प्रसंग येता जाण्याचे ।।।। (अ.२०, ओ. ३०)**

आपला पती अडचणीत असतांना त्याला योग्य सल्ला देणारी घरातील गृहिणीच असते. परंतु आपण अजूनही तिचा योग्य मान सन्मान करु शकलो नाही.

स्त्रियांना सतत डावलल्यामुळे आज त्यांचेमध्ये विद्रोह प्रगट होत असेल तर ते साहजिकच आहे. आपण ह्यांच्या नजरेमधूनच विचार करणे येथे क्रमप्राप्त ठरेल.

**३. स्त्रियांच्या दुरवस्थेत राष्ट्राचे अहित**

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा स्त्रियांच्या नैतिक-आत्मिक सामर्थ्यावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. स्त्री ही जेवढी सक्षम व सशक्त असेल तेवढीच विकासास कारणीभूत ठरू शकते. राष्ट्रमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, रजिया सुलताना, मदरतेरेसा यासारख्या मातांनी भारताची सक्षम जडणघडण करण्यात आपले आयुष्य वेचल्याचे सर्वश्रुत आहे. पण तरीही आजच्या युगामंध्ये आम्ही स्त्रियांचे वर्चस्व मान्य न करता त्यांना दुत्कारण्याचे कार्य सतत करीत आलो. आहे. मात्र याचा परिणाम म्हणजे उद्या हे जग सक्षम न निपजता दुर्बल व अपंग निपजले तर आश्चर्य वाढायला नको. राष्ट्रसंत म्हणतात.

**हीन दुबळे केले स्त्री-समाजा ।। तैसीच पुढे वाढली प्रजा**

**म्हणती स्त्रीजात तेवढी पशूच समाज ।। पाशवी झाले जग सारे ।।।। (अ.२०, ओ.४४)**

आज सर्वत्र स्त्रियांवर अन्याय होताना दिसतो. हा अन्याय किती काळ सहन करणार आहेत ? पण स्त्रीचे हे जे रुप आपण बघतो ते वरवरचे आहे. जर ती खऱ्या अर्थाने विरोध करायला लागती तर ती रणचंडिका बनल्याशिवाय राहणार नाही. यावर राष्ट्रसंत भाष्य करतात.-

**स्त्रियेसारखी मोहिनी नाही।। स्त्रियेसारखी वैरगिणी नाही ।।।।**

**स्त्रीयेसारखी मुलायम नाही ।। आणि कठोर रणचंडिका ।।।। (अ.२०, ओ.५३)**

स्त्रीची ही विविध रुपे जो स्वीकारतो आणि गौरवितो तो उच्चपदावर जाऊन बसल्याशिवाय राहाणार नाही आणि म्हणूनच स्त्री विषयी नेहमी मनात आदर बाळगलाच पाहिजे.

**४. महिलांवरील अन्याय**

समाजात महिलांवर होणाऱ्या अन्यायांमध्ये वाढ झाल्याचे निश्चितच दिसून येते. आधिच तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल समजले जाते. अशाच तिचे लग्न झाल्यानंतर तर तिचेवर होणाऱ्या अन्यायाची गणतीच करता येत नाही. येथे राष्ट्रसंत म्हणतात-

**काही लग्न होता गुंतविती घरी ॥ न रो कोलमयाहि उजागिरी ॥७॥**

**चूल आणि मूल हीच चाकरी ॥ सांगती तिज ॥८॥ (अ.२०, ओ. ६२)**

स्त्रियांना चूल आणि मूल यात गुतवून ठेवल्यामूळे तिचा विकास खुंटत चालता आहे. आजची स्त्री पुढारली आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी तिची स्थिती मोच काही बोलून जाते. आजच्या युगामध्ये स्त्रियांना जी वैचारिक व बौध्दिक परिपूर्ण मदत द्यायला पाहिजे ती मिळा मिळते का ? हा एक महत्त्वाचाप्रश्न म्हणावा लागेल.

**५. महिलांवर होणार विवाहविषयक अन्याय**

महिलांचे जीवनातील अत्यंत भावनिक व मंगलमय क्षण म्हणजे विवाह. परंतु आज या पवित्र धर्म बंधनास समाजाने अपवित्र करुन टेवले आहे. राष्ट्रसंत या संस्काराकडे अत्यंत विचारपूर्वक बघतांना दिसून येतात.आजच्या समाजामध्ये विवाह संस्कारात जो अनावश्यक खर्च व पैशाचा अपव्यय केला जातो त्याच्या विरोधात ते होते. ते म्हणायचे की ग्रहगोलांची गणिते व शकुन- अपशकुनासह तिथी वगैरे बघण्याची आवश्यकता नाही, तर प्रसन्न हवा, पाणी व ऋतु व सज्जनांची उपस्थिती हाच सुमुहूर्त असतो.

आज विवाहामध्ये हुंडा प्रथेमुळे कित्येकांचे विवाह मोडले. प्रसंगी मुलींचे बळीही गेले, पण तरीही समाज सुधरत नाही. राष्ट्रसंत म्हणतात की विवाह हा एक सामाजिक संस्कार आहे. हा संस्कार प्रत्येकाने जीवनात अंगिकारला तर सामाजिक जीवन परिपूर्ण झाल्याशिवाय राहाणार नाही. हा समाजाने हुंडा घेणाऱ्यांचा विरोध केलाच पाहिजे. म्हणून ते लिहितातत-

**ज्याने मुलामुलींचे पैसे घेतले ॥ त्यासी समाजाने पाहिजे निषेधिले ॥७॥**

**तरीच तो दुराग्रह मोडले ॥ जातील आता ॥८॥**

आज समाजाची दुरवस्था ही केवल जातीपातीमुळे झाली आहे. जातींचा विचार करणे अत्यंत गैर आहे. हिंदुस्थान जर माघारला असेल तो या विनाशक रुढींमध्ये अडकला असल्यामुळेच, म्हणूनच राष्ट्रसंत मिश्र विवाहाचा पुरस्कार करतात. ते सांगतांत-

**गुण गुणाकडे धाव घेतो ॥ आपण शास्त्री पुराणेही ऐकतो ॥७॥**

**मिश्र विवाहाने बिघडे काय ॥ म्हणणे व्यर्थ ॥८॥**

या प्रकारे जो मिश्र विवाहास मान्यता देतो तो एक प्रकारे समाज विकासस मान्यता देतो असे म्हणावयास हरकत नाही. स्त्रीचा छळ होण्याची आणखी एक जागा म्हणजे विधवा स्त्रीचा छळ नानाविध प्रकारांनी हा समाज करीत राहतो. तिला

धार्मिक, समाजिक कार्यामध्ये सहभागी होऊ दिले जात नाही. मात्र राष्ट्रसंत अशा विधवेला मानवतेने व मानाने वागविण्याचा सल्ला देतात. विधवांचा प्रश्न का निर्माण झाला याचा विचार करता त्यांच्या असे लक्षात आले की प्रश्न निर्माण झाला तो बाल विवाह प्रथेमधून आपल्या समाजामध्ये बालविवाहाची प्रथा अस्तित्वात आली आणि समाजाच्या विकासास खीळ बसली कच्च्या वयामध्ये मुलामुलींचे विवाह करुन दिल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा अभ्यास राष्ट्रसंतांनी केला. म्हणूनच ते विधवा विवाहाचा पुरस्कार करीत असतांनाच बालविवाहाचा तेवढ्याच तीव्रतेने निषेध करतांना दिसतात. राष्ट्रसंत म्हणतात-

**ऐशा गोष्टीस मात्र जपावे ०।० बालपणी लग्न नसावे ०।०।**

**समजुतदारीने लग्न करुन द्यावे**

अशारीतीने ते सामाजिक कुप्रथांचा निषेध करुन योग्य रीती-रिवाजांचा पुरस्कार करतात. समाजाचा अभ्यास करताना त्यांचे लक्षात आले की विवाहामध्ये पैसा वाया जातो आणि म्हणून हा पैसा वाचविण्याकरीता ते सामूहिक विवाह आयोजनावर भर देतात. हे विवाह समाजाचे विकासात निश्चितच कारण ठरतील हे त्यांचे मत आजच्या युगात मान्यता पावत आहे.

याप्रकारे महिलांवरील विवाह या प्रकारातून होणाऱ्या अन्यायाचाही विचार अत्यंत गांर्भीर्याने राष्ट्रसंत मांडतांना आपणास दिसून येतात. मात्र या सर्व प्रकारांमध्ये स्त्रियांवरील अन्यायाचा विचार होतो का ? हा प्रश्न आपणासमोर निर्माण होऊ शकतो. राष्ट्रसंत आपल्या विचारांचे माध्यमातून त्यालाही विचारपूर्वक उत्तर देतांना आपल्याला दिसून येतात. राष्ट्रसंतांनी याबाबत जी उपाय योजना समाजाला दिली आहे त्याचा विचार आपण थोडक्यात करण्याचा प्रयत्न करु.

### ६. सहशिक्षण

समाजामध्ये स्त्रिया व पुरुषांमध्ये दुरावा निर्माण होण्याचे महत्वाचे कारण जर कोणते असेल तर ते आहे शिक्षणाचा अभाव. या शिक्षणाच्या अभावामुळे आज स्त्रीपुरुषातील वैचारिक दरी वाढत आहे.[१] म्हणून राष्ट्रसंत सांगतात की समाजाने सहशिक्षण या गोष्टींचा आज गंभीरतेने विचार केला पाहिजे. ते म्हणतात.

**सहशिक्षणही नाही वावगे ०। जरी नैतिक भाव राहिले जागे० ०।०।**

**शिक्षणी जागृत ठेवले सर्वांने ०। काम नेत्या वडीलांचे ०।०।**

आज या सहशिक्षणाने परस्परांतील आकर्षण कमी होऊन अनाचार दूर होण्यास मदत होईल असे त्यांचे मत होते. या गोष्टीमुळे समाजात एक मुक्त वैचारिक वातावरण निर्माण होऊ शकते व असा समाज सामाजिकदृष्ट्या निकोप व सुदृढ असतो हे त्यांचे स्पष्ट व प्रामाणिक मत होते.

### ७. स्त्री-शिक्षण

स्त्रिया ह्या मुळातच हुशार असतात. त्यांना शिक्षणाचे व्दार जर मोकळे करुन दिले तर त्या आपल्या शिक्षणाच्याव्दारे आपल्या पुढे निघून जातील अशी भिती येथील अहं जोपासणाऱ्या पुरुषास वाढायला लागली. परिणामी स्त्रियांची शिक्षणाची व्दारे बंद झाली.

मात्र सुमारे १८५० नंतर परत एकदा ही सर्व विचारसारणी बदलायला सुरुवात झाली. भारतात परत एकदा स्त्री शिक्षणाचे वारे वाहायला लागते. मुक्त व आनंददायी शिक्षण या समाजामध्ये निर्माण करण्याची भूमिका हा समाज परत एकदा घेऊ लागला. मात्र समाजामध्ये स्त्री शिक्षिका नव्हत्या. समाजाची ही गरज लक्षात घेऊन महात्मा जोतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाईंना स्त्री शिक्षणाचे धडे देवून आद्य शिक्षिका बनवले. त्या मुलींना शिकवू लागल्या.

या परंपरेमध्ये संत मडळी जर मागे राहिली तर ती समाजाच्या चुकीच्या बाबींचा पुरस्कार करणारी मंडळी ठरली असती. मुलासोबत मुलींनाही शिक्षणाची संधी मिळालीच पाहिजे म्हणून राष्ट्रसंत नेहमीच आग्रही राहिले आहेत. मुलामुलींमध्ये शिक्षणाचे बाबतीत जे भेदाभेद होते ते त्यांना पूर्णतः अमान्य होते.

**मुलास विविध उच्च ज्ञान द्यावे ।। तैसेचि मुलींनाही मिळवावे ।।।।**

**हेळसांड करु नये ।। हे जाणावे समाजाने ।।।।**

ही त्यांची विचारसरणी होती, जी आपणास त्यांचे ग्रंथामधून स्पष्ट होते.

आजच्या काळामध्ये स्त्रियांना बरोबरीचे स्थान मिळत आहेत. त्याचबरोबर सहशिक्षण व बरोबरीने पुढे जाण्याच्या संधीसुध्दा मिळत आहेत. मात्र राष्ट्रसंतांनी ज्या काळी व ज्या परिसरात सदर विचार मांडले त्या काळात स्त्रियांना मानाचा व बरोबरीचा दर्जा नव्हता, म्हणूच राष्ट्रसंतांनी मांडलेले स्त्री शिक्षणाचे विचार महत्त्वपूर्ण व आदर्श ठरतात. ते आपल्याला नवचैतन्य व नवप्रेरणा देतात आणि म्हणूनच राष्ट्रसंतांचे विचार कालातील ठरतात.

**८. स्त्री संघटना**

निसर्गाने स्त्री नाजूक, कोमल व मातृहृदयी बनवली आहे. मात्र याचा गैरफायदा आजचा समाज घेत आहे. स्त्री ही अबला आहे असा त्यांचा समज झालेला आहे. अशा स्थितीमध्ये स्त्रियांचे एक संघटन असणे गरजेचे असल्यामुळे राष्ट्रसंतांना वाटते. कारण आपल्या विरुध्द होणाऱ्या अन्यायांचा प्रतिकार ती एकटी करु शकणार नाही असा त्यांचा निश्चितच विचार होता. म्हणून ते म्हणतात.-

**जैसी मुलांची संघटित सेना ।। तैसी स्त्रियांची असावी संघटना ।।।।**

**अपुल्या सुखदुःखाच्या भावना ।। प्रकटाव्या संभासंमेलनी ।।।।**

आजच्या स्त्रियांनी आपले स्वतंत्र मेळावे भरणे गरजेचे आहे. फायदा त्यांना झाल्याखेरीज राहाणार नाही हे जे महाराजांचे मत आहे ते आजच्या युगाला निश्चितच बोधप्रद आहे असे आपणास म्हणतात येईल आणि म्हणूनच राष्ट्रसंतांचे विचार प्रेरणादायी ठरतात. ते स्त्रियांना स्वतंत्र मेळावे घेण्याचा सल्ला देतात. पुढे आपल्या गुणांना विकसित करण्याचा हा उत्तम मार्ग आहे हे सुध्दा सांगतात. परिणामी स्त्रियांमध्ये आत्मभान निर्माण होऊन त्या वेळप्रसंगी प्रामाणीकपणाने प्रतिकाराची तयारी ठेवतील सहे राष्ट्रसंताचे म्हणजे आजच्या या युगात निश्चितच मान्यता पावल्याखेरीज राहात नाही.

**९. समारोप**

वं. राष्ट्रसंतांनी स्त्रियांचे उन्नतीविषयक आपले विचार विविध ठिकाणी मांडले आहेत. त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट व प्रेरणादायी होते हे आपणास निश्चितपणे लक्षात येते. राष्ट्रसंत हे फक्त भाषणे करणारे किंवा भजन-किर्तन करणारे संत नव्हते तर ते समाजमनाचा अभ्यास करणारे एक जननिष्ठ जनसहित्यिक होते. जनसामान्यांच्या भावभावनांना हात घालण्याची क्षमता त्यांचेजवळ होती. म्हणूनच ते सर्वसामान्य जनतेस शब्दांच्या शक्तीने जागृत करीत असत. पेटून उठण्याची जिद्द व क्षमता निर्माण करीत असत.

राष्ट्रसंतानी समाजाच्या व समाजातील चुकांवर नेहमीच मार्मिक भाष्य केलेले आहे. आजच्या युगामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, स्त्रियांची होणारी मानसिक व शरिरिक ससेहोलपट यांनी आपल्या भारत भ्रमणात अभ्यासलजी. परराष्ट्रातील स्त्रियांचा होणारा मानसन्मान अवलोकिला आणि मग आपले विवेकशील मत तयार करुन समाजासमोर ठेवले. हे मत एवढे सुंदर व सुनिश्चित होते की रामाजाने अगदी सहजतेने ते स्विकारले यामध्ये त्यांच्या विचारांचे माहात्म्य आपल्या लक्षात येते.

राष्ट्रसंतानी मांडलेल्या स्त्री विकासविषयक विचारांचा वारसा अपणापुढे चालविण्याचा यथाशक्ती प्रयत्न करुन भारतातील स्त्री सबला व कर्तृत्ववान बनवण्यास लावू या. यातच त्यांच्या विचारांचा विजय सामावला आहे. असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, संपा. सुदामजी सावरकर, महाराष्ट्र पाठ्यपुस्तक मंडळ, पूणे २००३
२. शेंदरे नमिता, राष्ट्रसंत स्त्रीदर्शन, ओम प्रकाशन, नागपूर १९९५
३. सावरकर डॉ. सुभाष, राष्ट्रसंत आणि ग्रामगीता, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती १९९७
४. सावरकर डॉ. सुभाष, ग्रामगीतारहस्य स्पंद २, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

मराठी विभाग प्रमुख
[illegible] राणा महाविद्यालय,
बडनेरा